Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# आदिवासी कादंबरी वाङमयातील समाजजीवन

**शितल पंढरीनाथ तुपे**
संशोधक विद्यार्थीनी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
sheetaldipaknikam@gmail.com

**प्रस्तावना :-**

आदिवासी समाजाबाबत सर्वसाधारण समाजामध्ये भीतियुक्त विचार असतात. आदिवासी समाजातील लोक प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्त्रियांचे जबरदस्तीने अपहरण करुन त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, स्वच्छंद लौंगिक संबंध ठेवणारे, वाटेल ते भक्षण करणारे, किंबहूना नरभक्षणाचीही खत न बाळगणारे, तसेच जादूटोण्यावर श्रध्दा ठेवणारे, उघडेनागडे लोक म्हणजे आदिवासी असा एक समज आहे. याउलट निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या, स्वच्छंदी वृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट नसणारे आदिवासींचे जीवन सुखमय व अनुकरणीय जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींयाचे जीवन सुखमय व अनुकरणीय आहे. हा विचारही विशेषत: पश्चिमी साहित्यात आग्रहाने मांडलेला आहे.

काही विचारवतांच्या मते या युगात सभ्यतेचा सर्वांगींण विकास झाला असला तरी या नैसर्गिक आनंदी जीवनाला आपण मुकतो. विज्ञानाच्या या प्रगतीमुळे आपणास मिळणारे भौतिक सुखापेक्षा त्यामुळे निर्माण झालेली दु:ख अधिक प्रमाणात आहेत. यावरुन आपणास असे दिसते आदिवासी समाजाची खरी ओळख असणारे व त्यांच्याबाबत चांगला विचार करणारे लोक कमी प्रमाणात दिसतात. भारताच्या इतिहासात ज्या त्या प्रदेशातील स्थानिक राज्यांसाठी हे आदिवासी लढल्याची अनेक उदाहरणे आहेत. या काळामध्ये आदिवासींची पिवणूक करणाऱ्यांविरुध्द बरीच बंडे झाली. १९७८ ते १९४७ च्या कालावधीत असाम, बिहार, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश या राज्यांत सुमारे ७५ बंडे झाली. यातील बरेच बंड हे ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या विरोधात होती. तसेच महाराष्ट्रातही भिल्ल जमातीच्या लोकांनी इंग्रजाविरुध्द उठाव केला होता. यानंतर युरोपीय लोकांची दृष्टी ही आदिवासींकडे वळाली. अमेरिकेत वसाहत करणाऱ्यांना स्थानिक लोकांना वारंवार युध्द करावी लागली. त्यावेळी यूरोपात आदिवासींच्या स्थितीब÷ल बरीच उलटसुलट चर्चा झाली. मॉन्टेनने आदिवासी संस्कृतीत ढवळाढवळ न करण्याचा आपल्या आधिकाऱ्यांना सल्ला दिला होता. त्यांच्या मते आदिवासी हे रानटी फुलांइतकेच रानटी असतात.

सतराव्या शतकामध्ये आदिवासीवर बरेच साहित्य लिहिले गेले. प्रख्यात फ्रेंच लेखक रूसो याने रानटी आदिमानवाच्या स्वतंत्र्य रम्य जीवनासंबंधी विचार मांडले व तेव्हापासून नोबल सॅव्हेज या संज्ञेस प्रसिध्दी मिळाली. पुढच्या शतकात कॅप्टन कुक व इतर प्रवाशांच्या प्रवासवर्णनांतून हाच सूर निघतो. कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलियाचे आदिवासी यूरोपीय लोकांपेक्षा फार सुखी आहेत, असे उद्‌गार काढलेले आहेत.

साम्राज्यवादाच्या व ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराबरोबर आदिवासी संस्कृतीचे अधिकधिक अध्ययन सुरु झाले, किंबहुना त्यांच्यात धर्मप्रसार सुकर व्हावा, म्हणून त्यांच्या चालीरीतींचे काटेकोर अध्ययन करण्यात आले. तत्पूर्वी आदिवासी संस्कृतीची तुटपुंजी ओळख अनेकांच्या प्रवासवर्णनांतून दिलेल्या माहितीच्या

आधारे झाली होती. आदिवासींच्या अगदी वेगळया आचारविचारांचे वर्णन सर्वसामान्य लोकांना गमतीदार वाटले.

मानवाप्रमाणेच मानवी संस्थांचाही विकास कोणत्यातरी तत्त्वानुसार झाला असावा, हे उघड आहे. मानवप्राणी जर एकाच जातीचा आहे, तर त्याच्या वेगवेगळया संस्कृती का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न कसोशीने करण्यात आला. आदिवासी समाज शतकानुशकते आधुनिक सभ्यतेपासून दूर अशा दऱ्याखोऱ्यांतून जगत असल्याने आदिवासींच्या संस्थांचे अध्ययन केल्यास, त्यावरुन मानवी संस्थांच्या उगमाब÷ल व विकासाब÷ल निश्चित कल्पना मांडता येतील, असे सुरवातीच्या मानवशास्त्रज्ञांस वाटले. त्या अनुषंगाने अमेरिका, आफ्रिका, आशिया व ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या संस्कृतींचे अध्ययन करण्यात आले. मानवशास्त्रीय सिध्दांत या अध्ययनावर आधारलेले आहेत. आदिवासी संस्कृतीत साम्यवादी अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था होती, असे मत ल्यूइस मॉर्गन या अमेरिकन मानवशास्त्रज्ञाने प्रथम मांडले, तिचा ऱ्हास होऊन पुढे दास्यश्रमधिष्ठित प्राचीन व्यवस्था, सरंजामशाही व नंतर भांडवलशाही यांचा उदय झाला. मानवशास्त्रामुळे आदिवासींच्या अध्ययनास महत्व प्राप्त झाले आहे. मानवशास्त्रज्ञांच्या मते आधुनिक जटिल संस्कृतींचा अभ्यास करण्यापूर्वी आदिवासींच्या साध्या व बिनगुंतीच्या संस्कृतींचा आयास जास्त सयुंक्तिक ठरतो, कारण साध्या संस्कृतीचे अध्ययन केल्याने मानवी व्यवहाराची मूलभूत तत्वे शोधून काढणे व त्यांच्या आधारे जटिल संस्कृतींना समजून घेण्याचा प्रयत्न करणे, अधिक सोपे व उपयुक्त होते. मानवसमाजाच्या सर्व घटकांचा सारखा विकास घडवून आणण्यासाठी आदिवासींविषयक अध्ययनास अलीकडे महत्व प्राप्त झाले.

*** आदिवासींची ठळक वैशिष्ट्ये :-**

१. आदिवासी जमात साधारणपणे अंतर्विवाही असते व तिचे बहिर्विवाही कुळींत विभाजन झालेले असते. समाजातील गट लहान असतात व ते नातेसंबंधावर आधारलेले असतात. या गटांचे सदस्यत्व आधुनिक समाजातील मंडळाच्या सदस्यत्वाप्रमाणे ऐच्छिक नसते.

२. एक एक आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहाते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते. रस्त्यांच्या अभावी तो प्रदेश दुर्गम असतो.

३. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे नियंत्रण पुर्णपणे पंचायत किंवा त्यांचा मुखिया करतो.

४. एकेका आदिवासी जमातीची बहुधा स्वतंत्र भाषा वा बोली असते.

५. आदिवासींचा धर्म क्षेत्रीय म्हणजे त्यांच्या निवासस्थानापुरता मर्यादित असतो; त्यांची तीर्थक्षेत्रही त्यांच्या भागातच असतात.

६. आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रमविभाजनाचा वा धंदेवार भिन्न सामाजिक गटाचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. याशिवाय आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. पाटावरवंटा, सापळे, जाळी, आकडे, गळ, दोऱ्या, टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता हयांसारखी प्राथमिक अवजरेच वापरात असतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन्नाची सार्वत्रिक देवघेव, हा टप्पा आदिवासी अर्थव्यवस्थेत नसतो. उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठाही नसतात. जो तो आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. त्यांची अर्थव्यवस्था बहुधा नाणे इ. चलनावाचून

चालणारी व वस्तुविनिमयाधिष्ठित असते. वस्तुविनिमय म्हणजे उपयुक्त वस्तूंची देवघेव.

७. धर्मात निसर्गपूजेस व जादूसारख्या क्रियाकल्पास महत्व असते.

८. आदिवासी समाजात पंरपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एक पिढी दुसऱ्या पिढीस कथा, काव्य, नृत्य इ. माध्यमांद्वारे देते.

९. आदिवासी समाजात परंपरा व सामाजिक नियंत्रण यांवर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो. दैनंदिन व्यवहारातील ठराविक चाकोरीमुळे सवयी व चालीरीती बनतात. एकंदरीत समाजात एकजिनसीपणा जास्त आढळतो.

१०. आदिवासी समाज बरेचसे स्वयंकेंद्रित असतात; त्यांचे आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवन ब्राहयसंपर्कापासून शतकानुशतके अलिप्त राहिल्याने स्वयंकेंद्रितता येणे स्वाभाविक आहे. जगातील सर्व समाज पूर्वी आदिवासी अवस्थेत होते. पुढे ते ग्रामीण समाज झाले. नंतर राजसंस्था आल्यानंतर राजधान्या व व्यापारी पेठा झाल्या व त्यामुळे नागरीकरणास प्रारंभ झाला. औदयोगिक क्रांतीनंतर संपूर्ण नागरीकरणाच्या दिशेने मानवी समाज वाटचाल करू लागले आहेत, असे प्रख्यात मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट रेडफिल्डचे मत आहे. आधुनिक काळात त्यामुळेच निर्जमातीकरणाची प्रक्रिया सुरु होऊन आदिवासी समाजांचे ग्रामीण समाजावस्थेत रूपांतर होऊ लागले आहे.

* **आदिवासीची अर्थव्यवस्था :-**

आदिवासी समाजाचे अर्थव्यवस्थेचे चलन वस्तुंची देवाणघेवाण असत. व्यक्तीने स्वत:पुरते अन्न गोळा करावयाचे, हाच एक आर्थिक व्यवसाय आदिवासी समाजात आहे, हे म्हणणे बरोबर नाही. अन्नाचा प्रश्न आदिवासी समाजात सामाजिक प्रश्न समजला जातो व त्याप्रमाणे तो हाताळला जातो. कौटुंबिक जबाबदाऱ्या, नातेसंबंध, शेजारधर्म वडिलांचा व मुखियांच मान, कुळींचे आचारधर्म, निषेधनियम, पूर्वज व देवता या सर्वाचाच विचार आर्थिक व्यवस्थेत केला जातो.

कामाकरिता काम किंवा पैशांकरिता काम, असा व्यवहार आदिवासी समाजात नसतो. ज्या व्यक्तीचे काम असेल, त्यास कामात मदत करणे इतरांचे कर्तत्व ठरते. किती वेळ काम केले, यावरून मोबदला ठरविण्यात येत नाही; कारण सर्वसाधारणपणे आदिवासी समाजात वेळेस विशेष महत्व नसते. आदिवासी आळशी असतात असे नाही, तर ते गरजेनुसार काम करतात येवढेच. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत या मूलभूत गरजांच्या पूर्वीसाठीच त्यांचे आर्थिक व्यवहार होतात. सोयरे व पूर्वज यांचा मान, आतिथ्य, दीक्षाविधी, विवाह, सामाजिक दर्जाचे दिग्दर्शन यासारख्या इतर गोष्टींनाही आदिवासींचे आर्थिक व्यवहार प्रेरित आहेत.

इतर समाजातील लोकांप्रमाणे आदिवासी श्रमविभाजन व्यावसायिक-सामाजिक गटवारीवर आधारलेले नसते; ते लिंगभेदावर आधारलेले असते. प्रत्येक व्यक्तीस शेती, मासेमारी, सुतारकी इ. व्यवसाय कमीजास्त प्रमाणात यावे लागतात वा येत असतात, त्यामुळे सहकार हे आदिवासी जीवनाचे ब्रीद आहे. आदिवासी उद्योगात तांत्रिक व धार्मिक क्रियांचा फार जवळचा संबंध असतो. शेती, मासेमारी किंवा होड्यांचे उत्पादन, प्रवास इत्यादींशी धार्मिक विधी निगडीत असतात. वस्तुविनिमयातही गिऱ्हाईक कोण आहे, त्याचा दर्जा काय आहे इ. घटक लक्षात घेतले जातात. स्वत:चा मोठेपणा, दाखविण्यासाठी दुसऱ्याने दिलेल्या देणगीपेक्षा अधिक भारी किंमतीच्या देणग्या दिल्या जातात. वस्तूची किंमत तिच्या विनिमयक्षमतेवरुन न

ठरविता तिच्या उपयोगावरुन ठरविली जाते. काही आदिवासी समाजात मात्र काही पदार्थ्यांचा चलन म्हणून उपयोग करतात; निकोबार बेटात नारळ, आफ्रिकेत कवड्या किंवा भाल्याची पाती अशा प्रकारे चलन म्हणून उपयोग होतो.

* **अन्नसंपादन:-**

आदिवासी समाजामध्ये प्रामुख्याने अन्नाचे उत्पादन करणे व अन्न गोळा करणे हे दोन स्त्रोत आढळतात. मग यामध्ये शिकार, मासेमारी व इतर अन्न पदार्थ मिळविण्याचे काम हे लोक करतात. जवळपास सर्व आदिवासी जमातीत याचे प्रामुख्य अधिक प्रमाणात दिसून येते. हे लोक गुराढोरांचा उपयोग न करता अन्नधान्य पिकवण्यासाठी अंममेहनतीला महत्व देतात. अलीकडे विविध प्राणी ते शेती व्यवसायामध्ये करत आहे. काही जमाती सांस्कृतिक दृष्टया एकमेकांपासून भिन्न असल्या तरी अन्नसंपादन करण्यामध्ये काही वैशिष्टये समान आढळून येतात.

* **सांस्कृतिक जीवन :-**

आदिवासी समुदाय हा सांस्कृतिक नृत्य, गायण तसेच विविध कला मध्ये निपूण आहे. प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये वेगवेगळया रुढीपरंपराला अनुसरुण सांस्कृतिक जीवनमान आढळून येते. आदिवासी आपला पेहरावमध्ये विविध निसर्गांतील मिळणाऱ्या विविध वस्तुचा समावेश मोठया प्रमाणात करताना दिसून येतात. यामाध्यमातून विविध कला जोपासताना हे आदिवासी दिसतात. दैनंदिन जीवनमामध्ये आदिवासी हे आपणास मागास वाटत असले तरी नैसर्गिकदृष्या मात्र ते संपन्न आढळून येतात. त्यांच्या अंगी विविध कला असलयाचे आपणास त्यांच्या राहणीमानावरुन दिसून येते.

थोडक्यात आदिवासी समाजाचे जीवन हे एक संघर्षपूर्ण असले तरी मात्र ते निसर्गांच्या सानिध्यात असल्याने ते एक वरदान म्हणता येईल. या निसर्गाला एक प्रकार आदिवासी देवता मानत असल्याने आपला निसर्ग कसा चांगला राहील याकडे आदिवासी विशेष लक्ष देतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) गारे गोविंद, 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती', अमृत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती, १९९३, पृ.१.
२) गावित माहेश्वरी, 'महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य' : एक शोध, दास्ताने प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४, पृ.२१.
३) तुकाराम विनायक, 'आदिवासी साहित्य' : दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१२, पृ.६३.
४) डॉ. माहेश्वरी गावित, 'आदिवासी साहित्यविचार' वाड्.मयसेवा प्रकाशन नाशिक रोड, प्रथमावृत्ती फेब्रुवारी २००९, पृ.क्र. १७.
५) डॉ. विनायक तुमराम, 'शतकातील आदिवासी कविता' हरिवंश प्रकाशन चंद्रपूर, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट २००३, पृ.क्र. १३.
६) डॉ. धनाजी गुरव, 'आदिवासी साहित्य' (डॉ. गोविंद गारे यांचा लेख) पृ.क्र.३८